# प्रेसनोट दि ३०/०३/२०१९

# कोथरुड पोलीस स्टेशन पुणे शहर

## <u>अल्पवयीन मुलीस व वयस्कर आजी यांना सुखरुप तिचे नातेवाईकांचे ताब्यात दिलेबाबत.</u>

दि.२९/०३/२०१९ रोजी सायंकाळी ०६/०० वा चे सुमारास एक वयस्कर महीला ही घाबरलेल्या अवस्थेत व तीचेसोबत असलेले एक अल्ववयीन मुलगी रडत असलेल्या अवस्थेत पो.शि.८५५० शेवाळे यांना दिसुन आल्याने,त्यांनी सदर वयस्कर महीलेकडे विचारपुस केली असता तीने तिचे नाव कौशल्या ज्ञानोबा चादर,वय-६० वर्षे व तीचे सोबत असलेली लहान मुलगी स्वराली शिंपले,वय-अडीच वर्षे असे असल्याचे सांगुन त्या बिड येथील राहणा-या असुन,सध्या ते त्यांचे नातु सतिष सिंपले यांच्या घरी आलेले असुन सायंकाळी ते बाहेर फिरण्यासाठी पडलेले असताना दोघींचा रस्ता चुकलेले होता. त्यांचे घर हे मंदीरा जवळ असलेबाबत सांगितले. त्याव्यतिरिक्त त्यांना काहीएक माहीती नसलेबाबत सांगीतले. त्यानंतर पो.शि.८५५० शेवाळे यांनी फेसबुक साधनाचा वापर करुन त्याव्दारे सदर वयस्कर महीला हीचा नातु सतिश सिंपले यांचा शोध घेवुन,सदर वयस्कर महीला व अल्पवयीन मुलीस त्यांचे ताब्यात सुखरुप दिले.

अशा प्रकारे इकडील पो स्टे पो.शि.८५५० शेवाळे यांनी उत्तम कामगिरी केली आहे.

**(प्रतिभा जोशी)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोथरूड पोलीस ठाणे पुण